महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ: मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ २१**

# चंद्रपूर येथे महानिर्मितीच्या पहिल्या सौर उर्जाकेंद्राची उभारणी

**मुंबई दि. १ जून :** राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन महत्त्वाकांक्षी विस्तारीकरण कार्यक्रम राबवणाऱ्या महानिर्मितीने चंद्रपूर येथे १ मेगावॅट क्षमतेचे पहिले-वहिले सौर उर्जाकेंद्र उभारणीचे काम हाती घेतले आहे. या पहिल्यावहिल्या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रकल्पाद्वारे महानिर्मितीने प्रथमच अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा वापर करुन वीजनिर्मिती करण्याचे ठरविले आहे.

१ मेगावॅट क्षमतेचा हा प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मितीने या क्षेत्रातील अग्रगण्य मेसर्स. मोझरबिअर इंडिया लिमिटेड या कंपनीला हे कंत्राट दिले असून या प्रकल्पाची उभारणी डिसेंबर २००९ च्या आधी पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पातून प्रतिवर्षी सुमारे १.५ दशलक्ष युनिट्स इतके विजेचे उत्पादन ग्रीडसाठी साध्य होणार आहे. हा प्रकल्प **सोलर फोटोव्होल्टॅअिक** तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे. सदर प्रकल्पासाठी **मे. मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस** ही संस्था सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आली आहे.

देशाच्या वीजनिर्मिती क्षेत्रात स्थापित क्षमतानिहाय एन.टी.पी.सी. खालोखाल अग्रगण्य असणाऱ्या महानिर्मितीने नव्या दिशेने उचललेले हे पाऊल आहे. मा. पंतप्रधानांच्या कार्यालयाद्वारे निर्देशित करण्यात आलेल्या **पर्यावरण तापमानविषयक राष्ट्रीय कृती** आराखड्याशी ते सुसंगत आहे. झपाट्याने नष्ट होत असलेले कोळशाचे साठे तसेच कोळसा ज्वलनाद्वारे पर्यावरणावर होणारे तापमानिक परिणाम लक्षात घेता अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा प्रभावी वापर करण्यासाठीचा महानिर्मितीचा हा प्रकल्प निश्चितच उल्लेखनीय आहे.

सध्या महानिर्मितीच्या परळी (५०० मेगावॅट), पारस (२५० मेगावॅट), खापरखेडा (५०० मेगावॅट), भुसावळ (२x५०० मेगावॅट), चंद्रपूर (२x५०० मेगावॅट) इत्यादि औष्णिक प्रकल्पांचे उभारणीचे कामदेखील क्षेत्रीय पातळीवर वेगाने पूर्णत्वाकडे जात आहे.

---

प्रति,  
**माननीय संपादक ,**  
दैनिक

दिनांक : ०१.०६.२००९

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**